विभागीयशिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे ४११ ००१.

दूरध्वनी क्र. ०२०-२६१२२२१७
वेबसाईट www.dydepune.com

ई-मेल आयडी क्र. dydpune@gmail.com.

---

जाक्र.उमाशि३/पुवि/इ.१२वीप्रवेश/२०१६-१७/ ९८५४

दिनांक : १५.०६.२०१६

15 JUN 2016

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक,
उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविदयालय.

विषय : इ.११वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१६-१७साठीची कॉलेज प्रोफाईलमधील माहिती तपासणीबाबत.

उपरोक्त विषयाबाबत इ.११वी ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया सन २०१६-१७ सुरु असून विदयार्थ्यांचे प्रवेश अर्ज ऑनलाईन सादर करण्याचा अंतिम दिनांक १७ जून, २०१६ आहे. त्यानंतर प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रियेचे कामकाज सुरु होणार आहे.

आपणास सूचित करण्यात येते की, आपण कॉलेज रजिस्ट्रेशनमध्ये दिलेली माहिती अचूक असल्याची खात्री करण्यासाठी दि. १६ व १७ जून, २०१६ रोजी सकाळी १०.०० ते सायं.५.०० वाजेपर्यंत आपल्या कॉलेजच्या लॉगिंन मधून pune.fyjc.org.in या वेबसाईटवर पुढील मुद्दयांप्रमाणे माहिती तपासून सर्व माहिती बरोबर असल्याची खात्री करावी. त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास दि. १८ जून, २०१६ रोजी दुपारी ३.०० पूर्वी या कार्यालयास mail द्वारे कळवावे. त्यानंतर याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.

कॉलेज प्रोफाईल तपासणीसाठीचे मुद्दे पुढीलप्रमाणे -

१) इ.११वी प्रवेश क्षमता.( शाखानिहाय - कॉलेज कोडनिहाय)
२) इनहाऊस/अल्पसंख्यांक/व्यवस्थापन कोटा क्षमता
३) संवर्गनिहाय जागा वितरण तक्ता(seats distribution chart)

तसेच कार्यालयातील वरिष्ठ लेखनिक, श्री. जगताप, उच्च माध्यमिक शाखा यांचेकडे समक्ष पत्र देऊन ऑनलाईन दुरुस्ती करुन घ्यावी.

MRaut 15.6.16
(मिनाक्षी राऊत)
सहा. शिक्षण संचालक
पुणे विभाग, पुणे.